ePaper

# मध्यरात्रीनंतर महाराष्ट्राचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री थेट गोव्याला पोहोचले



| वर्ष - 6 । अंक - 85 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- सोमवारपासून दिवसाआड पाणीपुरवठा;पाणीकपातीवर शिक्कामोर्तब
- अग्निवीरांच्या महत्वाकांक्षेला कॉंग्रेसचा राजकीय खोडा
- एकनाथ शिंदे राज्याचे नवे मुख्यमंत्री!


www.mahaenews.com | ।शुक्रवार ।दिनांक 1 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



माझ्या मंत्रिमंडळामध्ये शंकरराव चव्हाण हे अर्थमंत्री होते. शंकरराव चव्हाणांच्या मंत्रिमंडळात मी मंत्री होतो. पण मी ज्यावेळी मुख्यमंत्री झाली, त्यावेळी शंकरराव चव्हाण माझ्या मंत्रिमंडळात ज्यॉईन झाले. चव्हाणांनंतर शिवाजीराव निलंगेकर मुख्यमंत्री होते. त्यानंतर मंत्री बनवण्यात आलं. अशोक चव्हाण तेही राज्याचे मुख्यमंत्री होते. मंत्रीपदाची जबाबदारी त्यांनी सुद्धा स्वीकारली. त्यामुळे अशी उदाहरणं महाराष्ट्रात घडलेली आहेत. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांची स्वीकृती मला आश्चर्यकारक वाटली नाही.

**-शरद पवार, राष्ट्रवादी अध्यक्ष**

उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांनी विचारलं होतं तिथे गेल्यानंतर तुम्हाला मुख्यमंत्री करणार का? ते झालं तर मला आनंद होईल. सगळा एक सुवर्ण योग जुळून आला आहे. जी इच्छा उद्धव ठाकरेंची होती की, त्यांना स्वतः मुख्यमंत्री व्हायचं नव्हतं एका शिवसैनिकाला मुख्यमंत्री करायचे होते. तो शिवसैनिक म्हणजे एकनाथ शिंदे होते, हे अनेक वेळा त्यांनी आम्हाला बोलून दाखवले आहे. ज्या विचारावर भाजप शिवसेना एकत्र राहिली ते विचारही मार्गी लागले आहेत.

**-दीपक केसरकर**



## शॉर्ट न्यूज »

### बचत गटांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणार– आयुक्त पाटील

पिंपरी । नवी दिशा हा उपक्रम ख-या अर्थाने प्रेरणेची दिशा दाखविणारा असून महिला बचत गटांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यासोबतच त्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी महत्वपूर्ण ठरणार आहे, असा आशावाद आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी व्यक्त केला. कोणत्याही कामाला कमी न लेखता स्वयंप्रेरणेने समाजासाठी केलेले काम अभिमानास्पद असते. नवी दिशा प्रकल्पाच्या माध्यमातून बचत गटांनी काम घेऊन ते जबाबदारीने पार पाडल्यास या उल्लेखनीय कामाची देशभर चर्चा होईल, असे मत देखील पाटील यांनी व्यक्त केले.


### पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजप पुन्हा सत्तेत येईल - उमा खापरे

# पिंपरी महापालिकेत भाजपची सत्ता पुन्हा येणार का..?

## नवनिर्वाचित आमदार उमा खापरे म्हणाल्या...'ऑफ कोर्स येणार!'

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।**

राज्यातील गेल्या नऊ दिवसांची राजकीय कोंडी अखेर बुधवारी (ता. २९ जून) फुटली. महाविकास आघाडी सरकार जाऊन आता शिवसेना बंडखोर आणि भाजपचे सरकार आले आहे. राज्यातील या सत्तातरांमुळे आगामी महापालिका निवडणुकीचीही समीकरणे आता बदलली जाणार आहेत. राज्यात पुन्हा सत्तारुढ झाल्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेतही पुन्हा सत्तेत येणार असल्याचा दावा



भाजपने नव्याने केला. नाट्यमय सत्तात्तरांतून राज्यात भाजप पुन्हा सत्तेत आल्यामुळे पिंपरी पालिकेतही पक्ष पुन्हा सत्तेत येणार का? अशी विचारणा नवनिर्वाचित आमदार उमा खापरे यांना केली असता, 'ऑफ कोर्स, येणारच,' असे ठाम उत्तर त्यांनी दिले.

पिंपरी पालिकेत मुख्य लढत ही भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस या दोन्ही माजी सत्ताधाऱ्यांमध्येच आहे. राष्ट्रवादीची १५ वर्षांची राजवट संपवून २०१७ ला भाजप प्रथमच बहुमताने पिंपरी पालिकेत सत्तेत आली. तिने २०२२ ला शंभर प्लसचा नारा देत पुन्हा सत्तेत येण्याचा दावा शहरातील तीनपैकी आपल्या दोन आमदारांच्या ताकदीवर अगोदर केला होता. कारण, त्यांच्या बळावरच २०१७ ला भाजप पालिकेत सत्तेत आली होती. मात्र, राज्याच्या सत्तेतील राष्ट्रवादीचा या भाजपच्या घोषणेला मोठा अडसर होता. त्यात राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि अजित पवार यांनीच जातीने पिंपरीच्या निवडणुकीत लक्ष घातल्याने भाजपला सत्ता राखण्यात अडथळा निर्माण झाला होता. पण, आता राज्यातच सत्ताबदल झाला. तेथे भाजप पुन्हा सत्तेत आला.

### शहराच्या पहिल्या महिला आमदार ठरल्या

20 जूनच्या विधान परिषदेच्या निवडणुकीत पिंपरी चिंचवडकर उमा खापरे निवडून आल्या आहेत. त्या शहराच्या पहिल्या महिला आमदार ठरल्या आहेत. भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा असल्याने त्यांच्या पक्ष संघटनेच्या कौशल्याचा व अनुभवाचा पक्षाला पिंपरी पालिका निवडणुकीत फायदा होणार आहे. नाट्यमय सत्तात्तरांतून राज्यात भाजप पुन्हा सत्तेत आल्यामुळे पिंपरी पालिकेतही पक्ष पुन्हा सत्तेत येणार का? अशी विचारणा केली असता, 'ऑफ कोर्स, येणारच,' असे त्या ठामपणे म्हणाल्या.

### 2 लाख मिळकत धारकांनी घेतला विविध योजनांचा लाभ

# आनंदवार्ता! महापालिका तिजोरीत २५० कोटी जमा !

## कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांची माहिती

**पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागाच्या विविध सवलतींचा तब्बल २ लाख मिळकत धारकांनी लाभ घेतला आहे. या मिळकत धारकांनी ३० जून अखेर महापालिका तिजोरीत २५० कोटी रुपयांचा कर भरणा केल्याची माहिती कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली आहे. तसेच १ हजार कोटींचे उद्दिष्ट पूर्ण करणारच असा विश्वासही देशमुख यांनी व्यक्त केला आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात ५ लाख ७८ हजार मिळकतींची नोंद आहे. गेल्या आर्थिक वर्षात कर संकलन विभागाने ६२५ कोटींचा कर वसूल केला होता. मात्र, २०२२-२३ या आर्थिक वर्षात कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी १ हजार कोटी

> चालू आर्थिक वर्षातील एप्रिल महिन्यापासून कर वसूली नियोजन करण्यात आले आहे. यासाठी ३० जून पूर्वी जास्तीत जास्त नागरिकांनी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी आगाऊ कर भरणा सवलत व ऑनलाईन सवलत अशी एकूण सामान्य करामध्ये पंधरा टक्के सवलतीचा लाभ घ्यावा असे आवाहन वेळोवेळी करण्यात आले होते. आज ३० जून रोजी जवळपास दोन लाख मालमत्ताधारकांनी आपला संपूर्ण वर्षाचा मालमत्ता कर भरलेला असून मालमत्ता कराची एकूण वसूली २५० कोटी झालेली आहे.
>
> – नीलेश देशमुख, सहाय्यक आयुक्त, कर संकलन विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका

रुपयांचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले आहे. त्यानुसार पहिल्या तीन महिन्यात





तब्बल २५० कोटींची वसूली करण्यात या विभागाला यश आले आहे.

मालमत्ता कर विभागाने या वर्षीपासून अनेक सेवा ऑनलाईन केलेल्या आहेत. थकबाकी नसल्याचा दाखला, महिला, दिव्यांग, पर्यावरण पूरक सोसायटी अशा अनेक सवलती ऑनलाइन अर्जाद्वारे दिल्या जात आहेत.

त्यामुळे नागरिकांचा ऑनलाईन कर भरणा करण्याकडे कल वाढलेला आहे. तसेच पर्यावरण पूरक निवासी सोसायटी मालमत्ता यांना सामान्य करामध्ये जवळपास १० टक्के पर्यंत सवलत दिली गेल्यामुळे आता महापालिकेला त्याचा ऑनलाइन कर भरण्यामध्ये उपयोग झाला आहे.

## शॉर्ट न्यूज »

### रॉटव्हीलर श्वानाचा निवृत्त पोलीस अधिकाऱ्याला चावा

। पुणे। महाईन्यूज ।

रॉटव्हीलर जातीच्या श्वानाने एका माजी सहायक पोलिस आयुक्त आणि त्यांच्या श्वानाचा चावा घेतल्याचा प्रकार बुधवारी सकाळी घडला. बाणेर येथील विरभद्र नगरमधील गल्ली क्रमांक तीनच्या रस्त्यावर ही घटना घडली आहे. रॉटव्हीलर श्वानाचे मालक तुषार भगत आणि त्यांच्या वडिलांवर चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत निवृत्त सहायक पोलीस आयुक्त सुनील कलगुटकर यांनी तक्रार दिली आहे.

सुनील कलगुटकर सहाय्यक आयुक्त म्हणून पुण्यातून निवृत्त झाले आहेत. ते बाणेर परिसरात वास्तव्यास आहेत. त्यांच्याकडे एक श्वान आहे. तर, भगत हेदेखील याच परिसरात राहण्यास आहेत. रॉटव्हीलर श्वानाला रहिवाशी भागात ठेवण्यास कायद्याने बंदी आहे. तरीही भगत यांनी या श्वानाला रहिवासी भागात ठेवले.

दरम्यान, बुधवारी सकाळी साडेसातच्या सुमारास कलगुटकर हे श्वानाला घेऊन फिरायला गेले होते. त्याचवेळी तुषार भगत यांनी त्यांच्या रॉटव्हीलर श्वानाला मोकळे सोडले होते. या श्वानाने कलगुटकर आणि त्यांच्या श्वानाचा चावा

### पाणीकपातीचे वेळापत्रक येत्या दोन दिवसांपर्यंत जाहीर केले जाणार

# सोमवारपासून दिवसाआड पाणीपुरवठा;पाणीकपातीवर शिक्कामोर्तब

## पुणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून स्पष्ट

पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला साखळी प्रकल्पातील पाण्याने तळ गाठल्याने पाणीकपातीचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी सोमवारपासून (४ जुलै) करण्याचे निश्चित करण्यात आले असून महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून शुक्रवारी पाणीकपातीचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे.



शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणातील पाणीसाठ्याने तळ गाठल्याने शहराच्या पाणीपुरवठ्यात कपात करण्याचे जवळपास निश्चित झाले होते. खडकवासला धरण प्रकल्पातील पाणीसाठा कमी झाल्याने पिण्याच्या पाण्याचा वापर काटकसरीने करावा, असे पत्र जलसंपदा विभागाने महापालिकेला पाठविले होते. धरणात पंधरा जुलैपर्यंत पुरेल एवढाच पाणीसाठा असल्याने पाणीकपातीचा निर्णय महापालिकेला घ्यावाच लागणार असल्याचे स्पष्ट झाले होते. मात्र त्याबाबत आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक लांबणीवर पडत होती. आयुक्त विक्रम कुमार यांनी गुरुवारी पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन आढावा घेतला. त्या वेळी पाणीकपात करण्याचा आणि त्याची अंमलबजावणी सोमवारपासून करण्याचे निश्चित करण्यात आले. पाणीकपातीचे वेळापत्रक आज शुक्रवारी जाहीर केले जाणार आहे, असे पाणीपुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

शहराला एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जाणार असला तरी एकूण पाणी वापरात साधारणपणे २५ ते ३० टक्क्यांपर्यंत पाणीकपात केली जाईल. सध्या रोजचा पाण्याचा वापर १ हजार ६५० दशलक्ष लिटर एवढा आहे. त्यात ३० टक्क्यांपर्यंत कपात केली तर रोज सरासरी १ हजार २०० दशलक्ष लिटर पाणी वापर करावा लागणार आहे. त्यामुळे ४५० दशलक्ष लिटर पाणी कमी घेण्यात येणार असल्याने काही भागात पाणीटंचाई होण्याची शक्यता आहे.

शहरात गेल्या दहा महिन्यांपासून अपुरा, विस्कळीत आणि असमान पाणीपुरवठा होत आहे. शहरात पाणीकपात सुरू झाल्यानंतर अनेक भागात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेकडून दैनंदिन १ हजार ६५० दशलक्ष लिटर पाणी धरणातून घेण्यात येत आहे. मात्र आता ते १ हजार २०० दशलक्ष लिटर पाणी घेण्यात येणार असल्याने अनेक भागांचा पाणीपुरवठा विस्कळीत होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**उशिरा निर्णय**

धरणातील पाण्याने तळ गाठल्याने पाणकपातीचा निर्णय यापूर्वीच होणे अपेक्षित होते. मात्र पाऊस पडेल, या अपेक्षेने पाणीकपातीचा निर्णय लांबणीवर टाकण्यात आला. जलसंपदा विभागाकडून त्यासंदर्भात महापालिकेला वेळोवेळी इशारा देण्यात आला होता. पंधरा जुलैपर्यंतच पुरेल एवढे पाणी धरणात राहिल्याने पाणीकपात करण्याची हालचाल पाणीपुरवठा विभागाकडून सुरू झाली.

शहराला एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जाणार असला तरी एकूण पाणी वापरात साधारणपणे २५ ते ३० टक्क्यांपर्यंत पाणीकपात केली जाईल. सध्या रोजचा पाण्याचा वापर १ हजार ६५० दशलक्ष लिटर एवढा आहे. त्यात ३० टक्क्यांपर्यंत कपात केली तर रोज सरासरी १ हजार २०० दशलक्ष लिटर पाणी वापर करावा लागणार आहे.

# पुण्याचे पालकमंत्रीपद अजितदादांकडून चंद्रकांतदादांकडे येणार !

## यापूर्वी तीन-चार महिने पुण्याचे पालकमंत्री म्हणून चंद्रकांत पाटील यांनी केले आहे काम

पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



राज्याचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस उद्या तिसऱ्यांदा शपथ घेत आहेत. त्यांच्यासोबत शिवसेनेचे बंडखोर नेते एकनाथ शिंदे व भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्यासह पक्षाचे काही प्रमुख नेते मंत्रीपदाची शपथ घेणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. पाटील मंत्रीपदी शपथ घेणार असल्याने पुण्याचे पालकमंत्रीपददेखील त्यांच्याकडेच जाणार असल्याचे या सूत्रांनी सांगितले.

फडणीस सरकारच्या आधीच्या पाच वर्षाच्या काळातील सुमारे चार वर्षे पुण्याचे विद्यमान खासदार गिरीश बापट यांच्याकडे पुण्याचे पालकमंत्रीपद होते. बापट खासदार झाल्यानंतर ही जबाबदारी चंद्रकांत पाटील यांच्याकडे आली. त्यानंतर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत प्रदेशाध्यक्ष पाटील पुण्यातून कोथरूड विधानसभा मतदारसंघातून आमदार झाले.

प्रदेशाध्यक्ष असले तरी आमदार या नात्याने पाटील यांचा पुण्यात वावर होता. त्यामुळे पुण्यातील राजकारणात पाटील यांचाच शब्द अंतीम मानला जाऊ लागला. राज्यात आता सत्ताबदल होत आहे. त्यामुळे पुण्यातून मंत्री कोण होणार आणि पालकमंत्री कोण याची चर्चा सुरू झाली. या चर्चेचा कानोसा घेतला असता पुण्याचे पालमंत्रीपद पाटील यांच्याकडेच राहणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

पुणे महापालिकेत भारतीय जनता पक्षाची सत्ता पाच वर्षे राहिली. त्यानंतर आता होणाऱ्या महापालिका निवडणुकीत पुन्हा सत्तेवर येण्यासाठी भारतीय जनता पक्ष प्रयत्नशील होती.मात्र, राज्यात महाविकास आघाडीचे सत्ता होती. त्यामुळे भाजपाला अडचणींचा सामना करावा लागत होता. दुसरीकडे महाविकास आघाडीची सत्ता असल्याने पिंपरी-चिंचवड व पुण्यात राष्ट्रवादीने सत्ता काबीज करण्यासाठी गेल्या वर्षभरापासून तयारी सुरू केली होती. मात्र, आता पुन्हा फडणवीस यांचे सरकार सत्तेत येत असल्याने पुणे-पिंपरीसह राज्यातील विविध महापालिकांमध्ये सत्तेत येणे भाजपाला सोयीचे होऊ शकते.

प्रदेशाध्यक्ष असले तरी आमदार या नात्याने पाटील यांचा पुण्यात वावर होता. त्यामुळे पुण्यातील राजकारणात पाटील यांचाच शब्द अंतीम मानला जाऊ लागला. राज्यात आता सत्ताबदल होत आहे. त्यामुळे पुण्यातून मंत्री कोण होणार आणि पालकमंत्री कोण याची चर्चा सुरू झाली. या चर्चेचा कानोसा घेतला असता पुण्याचे पालमंत्रीपद पाटील यांच्याकडेच राहणार असल्याचे सांगण्यात येत आहे. पुणे महापालिकेत भारतीय जनता पक्षाची सत्ता पाच वर्षे राहिली. त्यानंतर आता होणाऱ्या महापालिका निवडणुकीत पुन्हा सत्तेवर येण्यासाठी भारतीय जनता पक्ष प्रयत्नशील होती

## शॉर्ट न्यूज

### हॉटेलमध्ये जेवणासाठी गेलेल्या घरात दीड लाखांची चोरी



।वाकड । महाईन्यूज । प्रतिनिधी ।

घरातील सर्वजण हॉटेल मध्ये जेवण करण्यासाठी गेले असताना चोरट्याने घरफोडी करून दीड लाखांचा ऐवज चोरून नेला. ही घटना सोमवारी (दि. 27) रात्री पावणे नऊ ते साडेदहा वाजताच्या कालावधीत द्वारका साई सोसायटी, रहाटणी येथे ही घटना घडली. चैतन्य साखरचंद बधान (वय 29, रा. द्वारका साई सोसायटी, गोडांबे कॉर्नर, रहाटणी) यांनी याप्रकरणी वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञाताच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांचे कुटुंबीय सोमवारी रात्री पावणे नऊ वाजताच्या सुमारास घराला कुलूप लावून हॉटेलमध्ये जेवणासाठी गेले होते.

### कॉंग्रेसच्या स्वार्थी राजकीय हेतूचा मुखवटा उघड

# अग्निवीरांच्या महत्वाकांक्षेला कॉंग्रेसचा राजकीय खोडा

### भाजपाचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांचा आरोप

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।



केंद्रीय मंत्रिमंडळाने जाहीर केलेल्या अग्निपथ योजनेमुळे देशातील राष्ट्रप्रेमी तरुणांना केवळ रोजगाराच्या नव्हे, तर देशसेवेच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. या थेट भरती योजनेस मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि कॉंग्रेसचे खासदार मनीष तिवारी यांनीच या योजनेची प्रशंसा केली. त्यामुळे कॉंग्रेसच्या स्वार्थी राजकीय हेतूचा मुखवटा उघड झाला, असा आरोप भाजपाचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी केला आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, अग्निपथ ही लष्कराच्या व्यापक आधुनिकीकरणाची क्रांतिकारी योजना आहे, अशा शब्दात या योजनेची प्रशंसा कॉंग्रेसचे खासदार मनिष तिवारी यांनी एका लेखात केल्याने कॉंग्रेसची पंचाईत झाली आहे. दुसरीकडे या योजनेतून सुरू झालेल्या भरती प्रक्रियेस तरुणांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून पंचेचाळीस हजार पदांच्या भरतीसाठी सहा लाखांहून अधिक उमेदवारांनी अर्ज केल्याने देशातील तरुणाईने या योजनेचा स्वीकार केल्याने कॉंग्रेसचा तिळपापड झाला आहे. देशांतर्गत दहशतवाद, नक्षलवादी कारवाया आणि परकी शक्तींनी पुकारलेले छुपे युद्ध अशा अनेक आव्हानांना तोंड देण्यासाठी तरुणांना सिद्ध करणाऱ्या या योजनेस विरोध करण्याकरिता कॉंग्रेससारख्या राजकीय विरोधकांनी देशात तरुणांची माथी भडकावण्याचे काम सुरू केले आहे.

> आमदार लांडगे म्हणाले की, अग्निपथ ही लष्कराच्या व्यापक आधुनिकीकरणाची क्रांतिकारी योजना आहे, अशा शब्दात या योजनेची प्रशंसा कॉंग्रेसचे खासदार मनिष तिवारी यांनी एका लेखात केल्याने कॉंग्रेसची पंचाईत झाली आहे. दुसरीकडे या योजनेतून सुरू झालेल्या भरती प्रक्रियेस तरुणांचा प्रचंड प्रतिसाद मिळत असून पंचेचाळीस हजार पदांच्या भरतीसाठी सहा लाखांहून अधिक उमेदवारांनी अर्ज केल्याने देशातील तरुणाईने या योजनेचा स्वीकार केल्याने कॉंग्रेसचा तिळपापड झाला आहे.



केवळ मोदी सरकारच्या एका महत्वाकांक्षी योजनेस अपशकुन करण्यासाठी राजकीय विरोधक बेरोजगारीच्या समस्येचे भांडवल करून निष्पाप तरुणांची माथी भडकावत आहेत.

अग्निपथ योजनेत सहभागी होणाऱ्या तरुणांना कौशल्य विकासाच्या प्रशिक्षणामुळे अर्थव्यवस्थेत नव्याने निर्माण होत असलेल्या उद्योजकता आणि नोकऱ्यांच्या अनेक संधींचा पाठपुरावा करणे शक्य होणार आहे. त्यामुळे चिथावणीच्या कारस्थानास युवकांनी बळी पडू नये, असे आवाहनही आमदार लांडगे यांनी केले आहे.

# ताथवडेतील झोपडपट्टी, छोटे व्यावसायिकांचे प्रथम पुनर्वसन करा

### महाराष्ट्र प्रदेश झोपडपट्टी सुरक्षा दलाचे राज्याध्यक्ष भगवानराव वैराट यांचा आंदोलनाचा इशारा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पिंपरी-चिंचवड शहरातील ‘ड’ क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील अशोक नगर, ताथवडे येथे गेल्या 50 वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टी व छोट्या व्यवसायिकांवर कारवाईस कडाडून विरोध कायम आहे. कारवाईची नोटीस बेकायदेशीर असून, प्रथम झोपडीधारकांचे पुनर्वसन करावे अन्यथा तीव्र आंदोलनाचा छेडण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश झोपडपट्टी सुरक्षा दलाचे राज्याध्यक्ष भगवानराव वैराट यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेस दिला आहे. त्या



अनुषंगाने झोपडपट्टी सुरक्षा दल व पथारी सुरक्षा दल या दोन्ही फलकांचे अनावरण भगवानराव वैराट यांच्या हस्ते त्या ठिकाणी करण्यात आले. या वेळी झोपडपट्टी सुरक्षा दलाचे शहराध्यक्ष हरिभाऊ वाघमारे, नाना थोरात, अण्णा लकडे, प्रमिला ठोंबरे, मोहम्मद शेख, काशिनाथ गायकवाड, सुनील भिसे, प्रा. सुरेश थिवार, वामन कदम, सुभाष गलांडे, रमेश चांदणे, अशोक कळसाईत, चंद्रशेखर पिंगळे, अर्जुन दाखले, बबन काळे, सुनील पवार, गौतम लोंढे, विलास थोरात, मुकुंद चंदनशिवे, मिलींद भिसे, शरद किशोर पवार, अशोक कळसाईत, ज्ञानेश्वर कुंभार, अशोक वाघ, सोमनाथ नवले, महेंद्र दाखले, राजु चांदणे, नलिनी कुंभार, प्रियंका कळसाईत, पुष्पा लकडे, बबिता चांदणे, संगीता लकडे, देवयानी थोरात, मधुरा आरसुळ, अंजना शिंदे, सरिता सुखदेवी, संगीता केदार, गायत्री आरसुळ आदी रहिवाशी व छोटे व्यावसायिक उपस्थित होते.

> “ वैराट यांनी राज्यातील गोरगरीब झोपडपट्टी मधील जनतेसाठी नेहमीच शासन दरबारी आंदोलन उपोषण व पत्रव्यवहार करून राज्यातील झोपडपट्टी मधील जनतेसाठी राज्यभर लढा उभारला आहे. यावेळी वैराट यांनी ताथवडेतील झोपडपट्टी बाबत विविध प्रश्नावर आपली भूमिका स्पष्ट केली. तसेच झोपडपट्टीतील नागरिकांना न्याय मिळवून देणार असल्याचे ही त्यांनी सांगितले.
>
> **- हरिभाऊ वाघमारे**
> शहराध्यक्ष, झोपडपट्टी सुरक्षा दल.

## संपादकीय »

# एवढे सारे अनर्थ, एका श्रद्धेने केले

***मानव जेव्हा आदिम अवस्थेत होता तेव्हा निसर्गात घडणाऱ्या घडामोडीतून त्याला जुजबी ज्ञान मिळत होते. शिकार केलेले प्राणी कच्चे खाल्ल्यापेक्षा भाजून खाल्ले तर अधिक रुचकर लागतात आणि पचायला सुद्धा कठीण जात नाही हे कधीतरी त्याच्या लक्षात आले असावे.***

जंगलात लागलेल्या वणव्यात भाजलेल्या एखाद्या प्राण्यांचे मांस खाल्ल्यावर हा फरक कदाचित कुणाच्या तरी लक्षात आला असावा.पुढे मांस किंवा कंदमुळे भाजून खाण्याचा प्रघात पडला असावा. अन्न किंवा मांस भाजून खायचे असेल तर अग्नीची गरज महत्वाची होती.तो मात्र दुर्मिळ होता,त्यामुळे अग्नी देव झाला.प्रत्येक गुफेबाहेर हा अग्नी सतत पेटत ठेवायला लागायचा.

पावसाळ्यात कडाडणार्या विजा, भयंकर पूर ,नियंत्रण नसलेल्या नद्या ह्या आकाशातील प्रभावी शक्ती वाटायच्या त्यामुळे सृष्टीचे सृजन होत असले तरी या काळात गुहेतून बाहेर पडणे आणि शिकार करणे कठीण होते त्यामुळे भेदक विजा आणि रौद्र महापूर शांत व्हावेत म्हणून कदाचित निसर्गाची प्रार्थना, पूजा सुरू झाली.विशिष्ट काळानंतर पावसाळा संपला मात्र हे सगळे आपल्या पूजा,प्रार्थनेचे फळ असल्याची जाणीव टोळीतील लोकांना झाली त्यातून त्याकाळी काही कर्मकांडे जन्माला आली असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.कदाचित श्रद्धा या मार्गाने जन्माला आली असेल असे समजले जायला सुरुवात झाली.पुढे लाखो वर्षांनी हे गुपित उलगडले मात्र लोकांच्या मेंदूतील श्रद्धा बाहेर निघू शकल्या नाहीत. आजच्या काळात अंदमानात राहणारे जावा आदिवासी असो की प्रगत मुंबईत राहणारा व्यक्ती असो त्याच्या डोक्यात श्रद्धा,आस्था, अकीदा, बिलिव्ह ,मान्यता एवढ्या घट्ट बसल्या आहेत की काहिकेल्या त्याचे निर्मूलन होणे शक्य नाही.उलट आजचा मानव जेवढा प्रगत होत गेला तेवढ्या त्याच्या श्रद्धा पोलादी बनत गेल्या आहेत.त्याचे पोषण व्हावे यासाठी सध्या सगळ्या शक्ती कार्यरत आहेत.धर्म ,अध्यात्म आणि संस्कार ही त्यांची हक्काची पोषण व्यवस्था बनली आहे.आजच्या काळात धर्म सर्वात मोठे आस्था संवर्धन करणारी केंद्रे बनली आहेत.श्रद्धा ठेवल्याने काहीच बिघडत नाही हे वाक्य ऐकायला निरुपद्रवी वाटत असले तरी त्याने मानवीय पिढ्यांचे आजवर सर्वात जास्त नुकसान केले आहे. श्रद्धा ज्या मेंदूत आपले बस्तान मांडत असते तिथे तर्क,प्रगती आणि बदलाला अजिबात स्थान मिळू शकत नाही.एवढेच नव्हे तर श्रद्धा, आस्था जुने नष्ट करू देत नाही त्यामुळे नव्याला स्थान मिळू शकत नाही.



## आनंदी सकाळ

# 'आषाढ संध्या घनिये एलो...'

मृद्गंधानं मन मोहरून यावं अशावेळी माझ्या मनावर मात्र अनामिक विरहाचं सावट घट्ट होऊ लागतं. विरहव्यथेनं गलबलून गेलेलं मन नेत्रांवाटे पाझरू लागतं. गळणाऱ्या पागोळ्या, अंगणात नाचणारे थेंब, डुलणाऱ्या वृक्षशाखाही उदासपण दूर करीत नाहीत. आतापर्यंत आनंदगान करणारी रसिक हृदयवीणा जणू खंडित होऊन भद्द आवाजात झंकारू लागते. असं का व्हावं? छे! काहीच कळत नाही. अशावेळी गुरुदेव टागोरांची ओळ ओठांवाटे बाहेर पडते, 'आषाढ संध्या घनिये एलो...' 'आषाढातील संध्या मेघांनी झाकाळून गेली आहे.' जलधारांची जोरदार वृष्टी, मन उद्विग्न झालेलं. अनेक तरंग मनात उठतात, पण विचारसागराचा किनारा गवसत नाही. कुठून आली ही व्याकूळता? म्हणजे गुरुदेव टागोरही विरह-व्याकूळ झालेत, पण क्षणभरच! लगेच त्यांना उत्तर सापडले आहे, 'हेरी अहरह तोमारी बिरह!' 'साऱ्या मानवी भावना, प्रेम, सुखदुःख अशा विविध स्वरूपात हे प्रभो, तुझाच तर विरह चराचरात व्यापून राहिला आहे!'

# पाडले कोणास? पडले कोण?






उद्धव ठाकरे यांचे महाविकास आघाडी सरकार पाडल्यानंतर गुरुवारी दिवसभर ज्या काही घडामोडी घडल्या त्या पाहिल्यास कोणाही विचारी जनाच्या मनास पडणारा प्रश्न असेल : पाडले कोणास आणि पडले कोण?

या प्रश्नाचे उत्तर शोधताना जे काही घडले त्याचा आढावा घेणे आवश्यक. यातील पहिली घटना म्हणजे शिवसेना फुटीर आणि भाजप यांनी मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे यांची घोषणा करणे. हाच अनेकांस धक्का होता. या निमित्ताने सतत धक्का देत राहण्याची आपली परंपरा भारतीय जनता पक्षाने कायम राखली आणि उद्धव ठाकरे गच्छन्तीनंतर त्यांच्या एकेकाळच्या उजव्या हातास म्हणजे एकनाथ शिंदे यांस मुख्यमंत्रीपदी बसवले. या संदर्भात एक कबुली द्यायला हवी. तीन दिवसांपूर्वी असे काही होणार असल्याचा सुगावा 'लोकसत्ता'च्या ठाणे प्रतिनिधीस लागला होता आणि तशी बातमीही दिली जाणार होती. परंतु माध्यमांत जर-तरला स्थान नसते. त्यामुळे ते वृत्त प्राधान्याने द्यायला हवे होते असे आता म्हणण्यात अर्थ नाही. अन्यांस मात्र शिंदे यांची निवड हा पूर्ण धक्का असेल. भाजपचा सध्याचा इतिहास पाहता खरे तर या धक्का देण्याच्या तंत्राचाही धक्का बसेनासा झाला आहे. असो. मुख्यमंत्रीपदासाठी शिंदे यांची निवड जाहीर झाल्यानंतर भाजपने असे का केले हा प्रश्न.


शिंदे यांच्या हाती मुख्यमंत्रीपद देणे या कृतीचे वर्णन सोप्या मराठीत 'काटय़ाने काटा काढणे' असेच होऊ शकते. भाजपसाठी सध्या सर्वात मोठा प्रतिस्पर्धी आहे तो शिवसेना आणि त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस. यांपैकी शिवसेनेस 'थंड' करण्याचे काम शिंदे अधिक सुलभपणे करू शकतील. परत शिंदे यांची संभावना आता गद्दार वगैरे विशेषणांनी करणेही अवघड. अशा टीकेचा अतिरेक झाल्यास 'सामान्य सैनिक मुख्यमंत्रीपदी बसलेला ठाकरे यांस पाहवत नाही' असे म्हणण्याची सोय शिंदे यांस अधिक. यातील दुसरा मुद्दा सामान्य शिवसैनिकास जास्त आकर्षक वाटू शकतो. तेव्हा शिंदे यांना मुख्यमंत्रीपदी बसवल्याने शिवसैनिकांच्या विरोधाची धार आपोआप बोथट होऊ शकते. असे करण्यातील भाजपचा स्वार्थ म्हणजे त्यामुळे शिवसेनेच्या टीकेचा रोख हा यापुढे भाजप नेतृत्वावर न राहता तो शिंदे यांच्यावर असेल आणि शिंदे यांच्यावरील टीका उलटण्याची शक्यता लक्षात घेता त्या टीकेसही नैसर्गिक मर्यादा राहतील.

# महंगाई डायन खाए जात है...

**महागाई वाढण्यामागे केवळ इंधनदरवाढ हे एकच कारण नसून यासाठी अनेक विविध कारणांची भली मोठी यादीच आहे.**

शासनकर्ते येतात आणि जातात. परंतु, महागाईची कारणे ही वर्षानुवर्षे कायम आहेत. ही सर्व कारणे लक्षात घेऊन यावर कायमस्वरूपी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. अन्यथा कमाई कितीही असली तरी महागाईच्या लाटेपुढे ती टिकणे अवघड आहे. म्हणूनच आज जवळपास १२ वर्षांनंतरही 'पीपली लाईव्ह' या सिनेमातील गाण्याच्या, 'महंगाई डायन खाए जात हैं,' या ओळी सर्वसामान्यांच्या स्मरणात आहेत.

सखी सैयां तो खूब ही कमात है, पर महंगाई डायन खाए जात है, २०१० साली प्रदर्शित झालेल्या 'पीपली लाईव्ह' या सिनेमातील एका गाण्याच्या या ओळी आजही सर्वसामान्यांच्या स्मरणात आहेत. खरंतर हा सिनेमा आणि त्यामधील गाणी काही सुपरहिट ठरली होती, असा काही भाग नाही. मात्र, सातत्याने



वाढणारी महागाई ही आजही या गाण्याच्या ओळी सर्वसामान्यांना स्मरणात ठेवण्यास भाग पाडत आहे.

महागाईचा भस्मासूर सध्या इतका प्रचंड वाढला आहे की, यामुळे सर्वसामान्यांचे जगणेच कठीण होऊन बसले आहे. दैनंदिन वापरातील प्रत्येक गोष्टीसाठी अधिकचे पैसे मोजावे लागत असल्याने सर्वसामान्य मेटाकुटीला आले आहेत. वाढत्या महागाईवर नियंत्रण मिळविण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न सुरू असल्याचा कांगावा सत्ताधाऱ्यांकडून नेहमी केला जातो. यात काही नावीन्य नाही. तर महागाईवर नियंत्रण मिळविण्यात सत्ताधारी अपयशी ठरल्याच्या टीकेचे ढोल सातत्याने विरोधकांकडून बडवले जातात. राजकारणात हे चालायचेच. परंतु सत्ताकर्ते कोणीही असो. वास्तव हेच आहे की, आजपर्यंत महागाईवर नियंत्रण मिळविणे हे कोणालाही शक्य झालेले नाही. याआधीचे राज्यकर्ते असोत किंवा सध्याचे अच्छे दिन आले ते केवळ महागाईचेच. सर्वसामान्यांच्या पदरी पडली ती मात्र फोल आश्वासनेच. कटू असले तरी हे वास्तव आहे आणि हे नाकारून चालणार नाही.

गेल्या काही महिन्यांपूर्वी सातत्याने होणारी इंधन दरवाढ ही महागाई वाढीला कारणीभूत असल्याचे काही आर्थिक तज्ज्ञांचे म्हणणे होते. इंधनाचे दर वाढताच वाहतूक खर्चामध्ये वाढ होते आणि प्रत्येक जीवनावश्यक गोष्टींच्या दरामध्ये वाढ होते, असे दावे या आर्थिक तज्ज्ञांकडून केले जातात.

## ।। अभंगवाणी ।।



अंतरींची घेतो गोडी ।
पाहे जोडी भावाची ॥१॥
देव सोयरा देव सोयरा ।
देव सोयरा दीनाचा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### आरटीओ कार्यालयातील खेपा टळणार

। मुंबई । महाईन्यूज ।

वाहन हस्तांतरण आणि आंतरराष्ट्रीय वाहन परवाने यासारख्या सेवा आधार कार्डशी जोडण्याचा निर्णय राज्य परिवहन आयुक्त कार्यालयाने घेतला आहे. यामुळे वाहन मालकाची सर्व माहिती त्या-त्या आरटीओ कार्यालयाला त्वरित उपलब्ध होणार असून नागरिकांना कागदपत्रे सादर करण्यासाठी आरटीओत जावे लागणार नाही, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

परिवहन विभागामार्फत अनुज्ञप्ती, नोंदणी प्रमाणपत्र, कर तसेच परवानासंबंधित ११५ सेवा देण्यात येतात. यापैकी ८४ सेवा या ऑनलाइन केल्या आहेत. करही ऑनलाइनच भरता येतो. ८४ सेवांपैकी नुकत्याच आठ सेवाही आधारकार्डशी जोडण्यात आल्या आहेत. शिकाऊ लायसन्सची (अनुज्ञप्ती) ऑनलाइन परीक्षा, वाहनांची राष्ट्रीय परवाना सुविधा ऑनलाइन करून आधारकार्डशी जोडण्यात आली आहे. त्यापाठोपाठ दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र, ना हरकत प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्रावरील पत्ता बदल, वाहनचालक अनुज्ञप्तीचे दुय्यमीकरण, अनुज्ञप्तीवरील पत्ता बदल, अनुज्ञप्तीचे नूतनीकरण या सेवाही आधारकार्डशी जोडल्याने नागरिकांना आरटीओ कार्यालयात खेटे घालण्याची वेळ येत नाही.

### भाजपचे धक्कातंत्र! शिंदे यांना मुख्यमंत्रीपद देऊन शिवसेनेवर त्यांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचा भाजपचा उद्देश स्पष्ट

# मुख्यमंत्रिपदी एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस

### राज्यात गेल्या 10 दिवसांपासून सुरू असलेल्या सत्तानाटय़ाच्या अंतिम टप्प्यात भाजपने धक्कातंत्राचा केला अवलंब

। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यात गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेल्या सत्तानाटय़ाच्या अंतिम टप्प्यात भाजपने धक्कातंत्राचा अवलंब केला. मुख्यमंत्रिपदी एकनाथ शिंदे, तर उपमुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी गुरुवारी सायंकाळी राजभवनात पार पडला. शिंदे यांना मुख्यमंत्रीपद देऊन शिवसेनेवर त्यांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचा भाजपचा उद्देश स्पष्ट झाला असला तरी फडणवीस यांच्याकडे उपमुख्यमंत्रिपद देण्यात आल्याने पक्षनेते बुचकळय़ात पडले. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवे सरकार सत्तेत येईल, अशी अटकळ बांधली जात होती. पण, दिवसभरात राज्याच्या राजकारणाला कलाटणी देणाऱ्या विविध नाटय़मय घडामोडी घडल्या. एकनाथ शिंदे हे दुपारी गोव्यातून मुंबईत परतले. शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा केला. त्यावेळी फडणवीस हे मुख्यमंत्री होणार आणि रात्री शपथ घेणार, असेच चित्र होते. राज्यपालांच्या भेटीनंतर फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत मात्र एकनाथ शिंदे हे रात्री मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील, असे जाहीर केले त्यावेळी नाटय़मय



घडामोडींचा पहिला अंक पाहायला मिळाला. आपण सरकारमध्ये सहभागी होणार नाही, पण सरकार योग्यपणे चालेल ही जबाबदारी माझी असेल, असे फडणवीस यांनी सांगितले. राजभवनात शपथविधी सोहळय़ाची तयारी सुरू असतानाच नाटय़मय घडामोडींचा दुसरा अंक घडला. फडणवीस यांनी नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्रिपदी सहभागी व्हावे, असा पक्षाचा आदेश असल्याचे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले. फडणवीस हे नव्या सरकारमध्ये सहभागी होतील, असे ट्वीट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केले. त्यानंतर थोडय़ाच वेळात फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. शिवसेनेचे वर्चस्व कमी करणे हे भाजपचे उद्दिष्ट लपून राहिलेले नाही. यातूनच भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रिपद सोपविण्याचा धक्कादायक निर्णय घेतल्याचे मानले जाते. शिवसेनेवर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी शिंदे गटाचा प्रयत्न असेल. उद्धव ठाकरे यांच्याकडे शिवसेनेचे नेतृत्व राहू नये, हा प्रयत्न आहे. तसेच देवेंद्र फडणवीस यांनाही भाजपच्या नेतृत्वाने धक्का दिल्याचे मानले जाते.

### बाळासाहेब आणि आनंद दिघे यांचा उल्लेख

राजभवनात झालेल्या छोटेखानी समारंभात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. शपथ घेताना मुख्यमंत्री शिंदे यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचा आवर्जुन उल्लेख केला. उपमुख्यमंत्रिपद नाईलाजाने स्वीकारावे लागत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांच्या देहबोलीवरून स्पष्टपणे जाणवत होते. शपथविधीनंतर माध्यमांशी काहीही न बोलता फडणवीस निघून गेले. भाजपमध्ये राष्ट्र आणि पक्ष सर्वात मोठा असतो. पक्षनेतृत्व निर्णय घेईल, त्यानुसार जबाबदारी घ्यावी लागते, असे कारण सांगत भाजपच्या नेत्यांना फडणवीस यांच्या उपमुख्यमंत्रीपदाबाबत माध्यमांसमोर सारवासारव करावी लागली.

### शिवसेना नेते अनुपस्थित

नव्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधी समारंभाला मावळते मुख्यमंत्री उपस्थित राहतात. परंतु, शिवसेनेतील बंडामुळे मुख्यमंत्रीपद गमवावे लागल्याची उद्विग्नता उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली होती़ शिंदे यांची मुख्यमंत्रिपदी निवड झाल्याने शिवसेनेच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखेच होते. यामुळेच मावळते मुख्यमंत्री उद्धव ठाकरे किंवा मावळत्या मंत्रिमंडळातील कोणीही यावेळी उपस्थित नव्हते. काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे नेतेही फिरकले नाहीत. भाजपचे नेते आणि कार्यकर्ते मोठय़ा प्रमाणावर उपस्थित होते, पण त्यांच्यात उत्साह अजिबात दिसत नव्हता.

# पावसाने दडी मारल्याने अर्थकारण अडचणीत

## जून संपत आला तरी पावसाने दडी दिली असल्याने कृषी–ग्रामीण अर्थकारण अडचणीत

। कोल्हापूर । महाईन्यूज ।

जून संपत आला तरी पावसाने दडी दिली असल्याने कृषी – ग्रामीण अर्थकारण अडचणीत आले आहे. पेरणीसाठी लागणारे बियाणे, खते यांची उलाढाल ठप्प झाली आहे. पेरणी झालेल्या ठिकाणी पाऊस कधी येणार याच्या चिंतेत शेतकरी सापडला आहे. ग्रामीण भागाच्या अर्थकारणाला ओहोटी लागली आहे.

खरीप पिकाची तयारी मेअखेरीस केली जाते. पश्चिम महाराष्ट्र मे महिन्याच्या मध्यास



सोयाबीनची पेरणी केली जाते. खरिपासाठी आवश्यक असणाऱ्या बियाणांच्या खरेदीची नोंदणी डिसेंबर महिन्यापासूनच होत असते. बियाणे, खत विक्रेते सहा महिने आधीच आगाऊ मालाची नोंदणी करीत असतात. त्याप्रमाणे आगाऊ पैसे बियाणे उत्पादक कंपन्यांकडे पाठवले जातात. बियाणांची विक्री झाली की त्यातून येणाऱ्या पैशातून खतांचे व्यवहार करण्याचा विक्रेत्यांचा शिरस्ता आहे. या विक्रेत्यांकडे बियाणे पोहोचली आहेत. पेरणीचे प्रमाण पाच टक्केही झालेली नसल्याने त्यांची चिंता वाढली आहे. पावसाने दडी मारल्यामुळे पेरणीची कामे खोळंबली आहेत. बियाणे खरेदीसाठी शेतकरी बियाणे, खत विक्रेत्यांकडे फिरकत नाही. विक्रेत्यांनी दरवर्षीचा अंदाज लक्षात घेऊन लाखो रुपयांची गुंतवणूक यामध्ये केलेली आहे. बियाणे जूनच्या मध्यास विकल्यानंतर त्यातून खतांची मागणी विक्रेते करतात. आता बियाणाचीच विक्री झाली नसल्याने पैसे उपलब्ध झालेले नाहीत. यामध्ये विक्रेत्यांची मोठय़ा प्रमाणात रक्कम अडकून पडली आहे. खताची मागणी करण्यासाठी हाती पैसा उपलब्ध नसल्याने खत, बियाणे विक्रेते आर्थिकदृष्टय़ा अडचणीत सापडले आहेत. बियाणे विक्रेत्यांना एका पिशवीमागे सुमारे २५ रुपयांचा नफा मिळतो; पण या वेळी विक्रीच झाली नसल्याने नफ्याची रक्कम अत्यंत कमी आहे.

### पावसाने अर्थकारण बिघडवले”

दरवर्षीच्या अनुभवानुसार जून मध्यापर्यंत बियाण्यांची विक्री झालेली असते. तोपर्यंत पावसानेही चांगला हात दिलेला असतो. या वर्षी जून महिन्यात राज्याच्या बऱ्याच भागांमध्ये एक-दोन दिवस जोरदार पाऊस झाला; पण त्यानंतर पावसाने झुकांडी दिली आहे. हवामान विभागाने पहिल्या अंदाजात नैंऋत्य मोसमी वाऱ्यांद्वारे जून ते सप्टेंबर या महिन्यांत देशभरात ९९ टक्के पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केली होती. सुधारित अंदाजात भारतीय हवामानशास्त्र विभागाने या वर्षी १०३ टक्के पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त केली होती.

# “उद्धव ठाकरेंचं मन दुखावण्याचा हेतू नव्हता!”

## आम्ही आजही शिवसेनेत, दीपक केसरकरांची प्रतिक्रिया

**शॉर्ट न्यूज »**

### मणिपूरमध्ये सैन्याच्या कॅम्पला भूस्खलनाचा फटका



।नवी दिल्ली । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

मणिपूरमध्ये सैन्यांवर जवानांवरच अस्मानी संकट ओढवलं आहे. मुसळधार पावसामुळे मणिपूरमध्ये भुस्खलन झाल्याची घटना घडली आहे. या भुस्खलनात सैन्याच एक कॅम्प ढिगाऱ्याखाली दबला गेल्याचे सांगण्यात येत आहे. आत्तापर्यंत ७ जणांचे मृतदेह काढण्यात आले असून, १९ जणांना वाचवण्यात यश आले आहे. मात्र, आणखी ५५ जवान ढिगाऱ्याखाली अडकल्याचे सांगण्यात येत आहे.

गंभीर जखमीं जवानांना उपचारासाठी नोनी आर्मी मेडिकल युनिटमध्ये दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार जिरीबामला इंफाळशी जोडण्यासाठी रेल्वे मार्ग तयार केला जात होता. . त्याच्या सुरक्षेसाठी टेरिटोरियल आर्मीचे १०७ जवान तैनात करण्यात आले होते. मात्र, बुधवारी मुसळधार पावसामुळे जवानांच्या कॅम्पला भुस्खलनाचा फटका बसला आणि जवानांचा कॅम्प उद्धवस्थ झाला.

या घटनेची माहिती मिळताच लष्कर, आसाम रायफल्स, मणिपूर पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर

।मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिवसेनेतील बंडखोर एकनाथ शिंदे गटाचे प्रवक्ते आमदार दीपक केसरकर यांनी उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिल्यानंतर बंडखोरांनी आनंद साजरा केल्याच्या आरोपावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. “उद्धव ठाकरेंनी राजीनामा द्यावा यासाठी आमचा बंड नव्हता. त्यामुळे त्यांच्या राजीनाम्यानंतर आम्ही कुणीही आनंद साजरा केला नाही. आम्ही आजही शिवसेनेत आहोत,” असं मत दीपक केसरकर यांनी व्यक्त केलं. ते गोव्यात पत्रकार परिषदेत बोलत होते.

दीपक केसरकर म्हणाले, “मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिल्यानंतर आम्ही आनंद साजरा केल्याचं बोललं जातंय, मात्र इथं शिवसेना आमदारांमध्ये कुणीही आनंद साजरा केला नाही. उद्धव ठाकरे यांनी राजीनामा द्यावा यासाठी आमचा बंड नव्हता. आमचा बंड आघाडीविरोधात होता. उद्धव ठाकरेंचं मन दुखावं हा हेतू नव्हता. आम्ही आजही शिवसेनेत आहोत. शिवसेनेत ठाकरे कुटुंबाला कोणाचाही विरोध नाही.”



“एकनाथ शिंदे मुंबईला मंत्रीपदाच्या वाटपात खूप मोठा वाटा घ्यायला गेले असं नाही. ते महाराष्ट्राचा विकास करण्यासाठी काय करता येईल त्यावर चर्चा करण्यासाठी गेले आहेत. दोन्ही पक्ष मिळून जो निर्णय घेतील त्यात आम्ही एकनाथ शिंदे यांच्यासोबत असू,” अशी माहिती दीपक केसरकर यांनी दिली.

दीपक केसरकर म्हणाले, “भाजपा हा राष्ट्रीय पक्ष आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस त्यांच्या राष्ट्रीय नेत्यांशी बोलून निर्णय घेतील. अद्याप कोणत्याही मंत्र्याची नावं ठरलेली नाही. येथे असलेल्या आमदारांमध्ये चलबिचल करण्यासाठी खोट्या बातम्या पेरल्या जात आहेत.”

“एकनाथ शिंदे आनंद दिघे यांचे मानसपूत्र आहेत आणि त्यांच्याप्रमाणे ते एकवचनी आहेत. त्यांनी एका मोठ्या पक्षाला शब्द दिला होता. त्यामुळे आम्ही हा शब्द फिरवणं शक्य नव्हतं,” असंही दीपक केसरकर यांनी म्हटलं.

दीपक केसरकर म्हणाले, “आता जी युती होत आहे ती महाराष्ट्राच्या जनेतेने निवडून दिलं त्यांची होत आहे. त्यामुळे संजय राऊत यांनी पाठीत खंजीर खुपसल्याची भाषा करू नये. पाठीत कुणी खंजीर खुपसला असेल तर तो संजय राऊत यांच्यासारख्या लोकांनी खुपसला. त्यांनी चुकीचा सल्ला दिला. संजय राऊत स्वतः शिवसेनेत आहेत, मात्र निम्म काम राष्ट्रवादीचं करत असतात. त्यावेळी ते जनतेच्या पाठीत खंजीर खुपसत असतात.”

का? दीपक केसरकर म्हणाले...

दीपक केसरकर म्हणाले, “मला विचारण्यात आलं की उद्धव ठाकरे यांच्यासोबतच्या १६ आमदारांचं काय होईल? त्यावर मी सांगितलं आहे की ज्यावेळी बहुसंख्य आमदार आपला नेता निवडतात त्या नेत्यासोबत त्यांना रहावं लागतं. आम्ही विधीमंडळात आमचा पक्षाची नोंदणी केली तेव्हा आम्ही आमच्या आमदारांच्या स्वाक्षरी दिल्या आहेत. त्यामुळे १६ आमदार आपला निर्णय बदलू शकत नाही. बहुसंख्यांकांनी निवडलेल्या नेत्याचा व्हिप त्या १६ आमदारांना देखील बंधनकारक राहील. आम्ही त्यांना आमच्यासोबत चला असा म्हणणार नाही.”

### पक्षाची घटना बंधनकारक ही जनतेची दिशाभूल : दीपक केसरकर

“पक्षांतर बंदी कायदा विधीमंडळात काय कृती करता यावर लागू होतो. व्हिपने हजर राहण्यास सांगितलं, मतदान करायला सांगितलं तर तसं करावं लागतं. कायद्यात ‘ऑन द फ्लोअर ऑफ द हाऊस’ असं स्पष्ट म्हटलं आहे. पक्षाची घटना बंधनकारक आहे अशी जनतेची दिशाभूल केली जात आहे. देशाची घटनाच अंतिम आहे असे न्यायालयाचे अनेक निकाल आहेत. त्याला डावलून इतर कोणतीही घटना काम करू शकत नाही,” असं मत दीपक केसरकर यांनी व्यक्त केलं.

“कायद्यात काही तरतूद असेल तर त्याला पक्षाची घटना डावलू शकत नाही. कारण पक्षाची घटना पक्ष ठरवतो. विधीमंडळात आपली लिखित घटना चालते. त्यापलिकडे कुणी जाऊ शकत नाही,” असंही दीपक केसरकर यांनी नमूद केलं.

### “संजय राऊत केंद्र व राज्यात वाद लावून देत आहेत”

यावेळी दीपक केसरकर शिवसेनेचे खासदार व प्रवक्ते संजय राऊत यांच्यावर सडूकन टीका केली. ते म्हणाले, “आज महाराष्ट्रात अशी परिस्थिती आहे आहे की संजय राऊत यांनी सकाळी ९ वाजता उठून एक पत्रकार परिषद घ्यायची. केंद्रावर टीका करायची आणि केंद्र व राज्यात वाद लावून द्यायचा असं सुरू आहे. त्यामुळे महाराष्ट्राची प्रगती करायची असेल तर केंद्र व राज्य यात चांगले संबंध असावे लागतील. हीच आमची भूमिका आहे.”

# BYJU’S कंपनीने २५०० कर्मचाऱ्यांना कामावरुन काढले

## भारतातील शैक्षणिक मार्केट मंदीचा कंपनीला फटका

।नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

बायजूस या कंपनीने २,५०० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना कामावरुन काढले आहे. २७ आणि २८ जून रोजी बायजूमधल्या १,५०० हून अधिक कर्मचाऱ्यांना काढून टाकल होतं. स्टार्टअप्सच्या फंडिंगमध्ये घट झाल्यामुळे कर्मचाऱ्यांना काढण्यात आले असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले आहे. तसेच भारतात दिवसेंदिवस शैक्षणिक मार्केट कमी होऊ लागल्यामुळे कंपनी तोट्यात असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.


२७ आणि २८ जून रोजी टॉपर आणि व्हाईटहॅट ज्युनियरमधून १५०० हून अधिक कर्मचाऱ्यांना काढून टाकले. या दोन्ही कंपन्या बायजूने गेल्या दोन वर्षांत विकत घेतल्या होत्या. यासोबतच, कंपनीने २९ जून रोजी सुमारे १००० कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकण्यासंबंधी ई-मेल पाठवला आहे. सामग्री आणि डिझाइन टीमवर सर्वाधिक परिणाम झाला आहे. टॉपर प्लॅटफॉर्मवरुन १२०० कर्मचाऱ्यांना काढून टाकण्यात आले आहे. तर ३०० ते ३५० कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकण्यात आले आहे, तर सुमारे ३०० कर्मचाऱ्यांना पुन्हा रुजू होण्यास सांगण्यात आले आहे. यासोबतच कंत्राटावर घेतलेल्या ६०० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्यात आले आहे.

२७ आणि २८ जून रोजी टॉपर आणि व्हाईटहॅट ज्युनियरमधून १५०० हून अधिक कर्मचाऱ्यांना काढून टाकले. या दोन्ही कंपन्या बायजूने गेल्या दोन वर्षांत विकत घेतल्या होत्या. यासोबतच, कंपनीने २९ जून रोजी सुमारे १००० कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकण्यासंबंधी ई-मेल पाठवला आहे. सामग्री आणि डिझाइन टीमवर सर्वाधिक परिणाम झाला आहे. टॉपर प्लॅटफॉर्मवरुन १२०० कर्मचाऱ्यांना काढून टाकण्यात आले आहे. तर ३०० ते ३५० कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकण्यात आले आहे, तर सुमारे ३०० कर्मचाऱ्यांना पुन्हा रुजू होण्यास सांगण्यात आले आहे.

सेल्स, मार्केटिंग, ऑपरेशन्स, कन्टेन्ट, डिझाईन अशा विविध विभागांमधून कर्मचारी कपात केली आहे. बायजूसने गेल्या वर्षी टॉपरला ५० दशलक्ष डॉलरमध्ये विकत घेतले होते. कंपनीचे म्हणणे आहे की त्यांनी टॉपरच्या एकत्रीकरणाची सुमारे ८० टक्के कर्मचारी कायम ठेवले आहेत. तर उर्वरित कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्यात आले आहे. यापूर्वी व्हाईटहॅट ज्युनियरने सुमारे ३०० पूर्णवेळ कर्मचाऱ्यांना काढून टाकले होते. ऑगस्ट २०२० मध्ये,

# ऑस्कर समितीवर काजोलची निवड


बॉलीवूड अभिनेत्री काजोल(KAJOL),आणि दाक्षिणात्य अभिनेता सूर्या,दिग्दर्शक सुष्मित घोष,रिंटू थॉमस,फिल्ममेकर रीमा कागती यांच्यासोबत तब्बल ३९७ नवीन सदस्यांना ॲकॅडमी ऑफ मोशन पिक्चर्स आर्ट्स ॲन्ड सायन्स म्हणजेच ऑस्कर अकादमीमध्ये(OSCAR ACADAMY) सामिल होण्याचं निमंत्रण गेलं आहे. अकादमीच्या वेबसाइटवर मंगळवारी रात्री उशिरा या सदस्यांच्या यादीला शेअर करण्यात आलं. या यादीत अशा लोकांची नावं आहेत ज्यांनी थिएटर आणि सिनेमा अशा दोन्हीमध्ये आपलं योगदान दिलं आहे.( अकादमीनं आपल्या जाहिर केलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे,"२०२२ मध्ये ४४ टक्के महिला आहेत आणि ३७ टक्के असे लोकं आहेत ज्यांना प्रतिनिधित्व करायची संधी कमी मिळाली आहे आणि ५० टक्के लोक हे अमेरिकेच्या बाहेरील ५३ विविध देशांमधून आहेत". या यादीत बॉलीवूडची गुणी अभिनेत्री काजोल आणि तामिळ स्टार सूर्याला देखील निमंत्रित केलं गेलं आहे.



# 'या' बॉलिवूड अभिनेत्यामुळे सुरु झाला 'चला हवा येऊ द्या' शो

चला हवा येऊ द्या हा शो प्रेक्षकांच्या मनात घर करून बसला आहे. शोमधील प्रत्येक कलाकाराने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. शोचा सुत्रसंचालक आणि अभिनेता, कॉमेडियन, लेखक, दिग्दर्शक म्हणून सगळ्यांना माहित असलेला निलेश साबळेचा आज ३० जून रोजी वाढदिवस आहे. निलेशच्या सुत्रसंचालनाचे तर लाखो चाहते आहेत. पण तुम्हाला माहितीये 'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमाची सुरुवात होण्याचं संपूर्ण श्रेय हे अभिनेता रितेश देशमुखला जातं.

निलेशने भाडिपाच्या रेडी टू लीड या सगमेन्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी निलेशला प्रश्न विचारला की शो सुरु करण्याआधी काही गोष्टी डोक्यात होत्या का? आणि शो कसा सुरु झाला? यावर उत्तर देत निलेश म्हणाला, "माझ्या आयुष्यातील बऱ्याच गोष्टी अपघाताने घडला. 'फू बाई फू' पाच वर्ष त्यावेळी चाललं होतं. त्याचवेळी रितेश देशमुखांचा 'लई भारी' हा चित्रपट आला होता. तर रितेश यांनी झी कडे विचारणा केली होती की हिंदीप्रमाणे आपल्याकडे एक-दीड तास प्रमोशन करता येईल असा मोठा प्लॅटफॉर्म आहे का? असा प्लॅटफॉर्म आपल्याकडे नव्हता. त्यावेळी मला झी मधून फोन आला की त्यांची अशी इच्छा आहे की असा एक एपिसोड करायचा आहे.'



## "अभिनेत्रींना समान वागणूक मिळत नाही कारण..."

# मराठी चित्रपटसृष्टीबाबत सई ताम्हणकरचं स्पष्ट मत



मराठीमधील बोल्ड अन् बिनधास्त अभिनेत्री म्हणजे सई ताम्हणकर. सईने फक्त मराठी चित्रपट, मालिका, वेबसीरिमध्ये अडकून न राहता हिंदी चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केलं. हिंदी चित्रपटांमध्ये काम करत तिने पुन्हा एकदा स्वतःला अभिनेत्री म्हणून सिद्ध केलं. आज ती मराठीमधील आघाडीची अभिनेत्री आहे. कोणत्याही विषयावर आपलं स्पष्ट मत मांडणं ही सईची खासियत आहे. सईने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये मराठी चित्रपटसृष्टीबाबत काही खुलासे केले आहेत. मराठी चित्रपटसृष्टीमध्ये अभिनेत्रींना कशी वागणूक मिळते? अभिनेत्रींचा मानधनाचा मुद्दा याबाबत सईने आपलं स्पष्ट मत मांडलं आहे. सईने जागरण डॉट कॉमला दिलेल्या मुलाखतीमध्ये मराठी चित्रपटसृष्टीमधील आताची परिस्थिती काय आहे? याबाबत सांगितलं. सई म्हणाली, "मी मराठी चित्रपटसृष्टीमधून आहे. मला इतर चित्रपटसृष्टीबाबत माहित नाही. पण मराठी चित्रपटसृष्टीमध्ये अभिनेत्रींना समान वागणूक मिळत नाही. आजही अभिनेत्यांच्या तुलनेमध्ये मराठी अभिनेत्रींना कमी मानधन मिळतं. मी खूप आधी याबाबत बोलले होते. पण त्याचा आजपर्यंत काहीच फायदा झाला नाही."

# युती तुटली तरी दोस्ती नाय.. विशाखा सुभेदारची समीर चौगुले



गेल्या काही वर्षात सोनी मराठी वाहिनीवर 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या मालिकेने अक्षरशः महाराष्ट्राला वेड लावले आहे. एकास एक पात्र, उत्तम संहिता आणि ते सादर करणारे इरसाल नमुने म्हणजेच आपले हास्यरथी यांनी आपल्याला खळखळून हसवले. या कार्यक्रमातील एक अविभाज्य घटक म्हणजे 'समीर चौगुले आणि विशाखा सुभेदार' यांची जोडी, ही जोडी मंचावर आली की हसून डोळे पाणवणार हे निश्चित असते. अनेक पात्र, नाना तर्हेचे विनोद करून यांनी आपल्याला लोटपोट केले. पण काही दिवसांपूर्वीच विशाखाने हा कार्यक्रम सोडला. पण आज तिचे समीरचे फोटो शेयर करत एक पोस्ट लिहिली आहे. कारण आज समीर चौगुले याचा वाढदिवस आहे. या पोस्ट मध्ये विशाखा म्हणते, 'सम्या... वेड्या माणसा.. वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.. ह्या गेल्या काही वर्षांत आपण एकत्र काम असताना, तुझ्याकडून खूप ऊर्जा मिळाली, प्रेसेन्स ऑफ माइंड, इन्स्टंट ह्या सारख्या अनेक गोष्टी शिकले..खूप काही केलंय आपण... एक मंच अनेक वर्ष SHARE केला..! तू उत्तम हाडाचा कलाकार आहेस मित्रा. तुझ्यातला लेखक दिवसेंदिवस स्फूरत चालल्ला आहे..!

# नवऱ्याला हता दुर्गुळेचं भारीच कौतुक


'अनन्या' चित्रपटाचा ट्रेलर पाहून हता दुर्गुळेचा पती प्रतिक शहाने एक खास पोस्ट शेअर केली आहे.

अभिनेत्री हता दुर्गुळे सध्या तिच्या चित्रपटांमुळे चर्चेत आहे. 'अनन्या' आणि 'टाईमपास ३' अशा तिच्या दोन चित्रपटांची घोषणा करण्यात आली. इतकंच नव्हे तर हे दोन्ही चित्रपट एकापाठोपाठ एक प्रदर्शित होणार आहेत. हताच्या 'अनन्या'चा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला. या ट्रेलरला प्रेक्षकांची चांगली पसंती मिळताना दिसत आहे. त्याचबरोबरीने या चित्रपटाचा ट्रेलर पाहून हताचा पती प्रतिक शहा देखील भारावला आहे. त्याने आपल्या बायकोसाठी खास पोस्ट शेअर केली आहे. प्रतिक आणि हताने मे महिन्यामध्ये लग्न करत सगळ्यांनाच सुखद धक्का दिला. दोघंही एकमेकांबरोबरचे फोटो सोशल मीडियाच्या माध्यमातून शेअर करताना दिसतात...



## शॉर्ट न्यूज »

### डायमंड लीग ॲथलेटिक्स : नीरजच्या कामगिरीकडे लक्ष



**स्टॉकहोम । महाईन्यूज**

यंदाच्या हंगामाला शानदार प्रारंभ करणारा ऑलिम्पिक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्राकडून गुरुवारी होणाऱ्या प्रतिष्ठेच्या डायमंड लीग ॲथलेटिक्समध्ये पदकाची अपेक्षा करण्यात येत आहे. तुर्कू (फिनलंड) येथे झालेल्या पोव्हो नुर्मी क्रीडा स्पर्धेत २४ वर्षीय नीरजने राष्ट्रीय विक्रमाची नोंद करीत ८९.३० मीटर भाला फेकून रौप्यपदक पटकावले. मग क्युर्टाने क्रीडा स्पर्धेत आव्हानात्मक वातावरणाचा सामना करीत नीरजने ८६.३० मीटर अंतर गाठत सुवर्णपदकाची कमाई केली. फिनलंडमधील या दोन्ही स्पर्धांमधील कामगिरीमुळे नीरजच्या हंगामाला सकारात्मक सुरुवात झाली आहे. तुर्कू येथील स्पर्धेत क्युर्टानेपेक्षा अधिक तारांकित खेळाडू सहभागी झाले.

# रोहित मुकणार; बुमराकडे नेतृत्व

## इंग्लंडविरुद्ध पाचव्या कसोटीसाठी भारताच्या अडचणीत भर

**।नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

दुसऱ्यांदा करोना चाचणीचा अहवाल बुधवारी सकारात्मक आल्यामुळे भारताचा नियमित कर्णधार रोहित शर्मा इंग्लंडविरुद्धच्या प्रलंबित पाचव्या कसोटी क्रिकेट सामन्याला मुकणार आहे. त्याच्या जागी जसप्रीत बुमराकडे नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली आहे.

३५ वर्षांत प्रथमच भारताच्या कसोटी संघाचे कर्णधारपद वेगवान गोलंदाजाकडे दिले जाणार आहे. कपिल देव हे भारताचे याआधीचे अखेरचे वेगवान गोलंदाजी करणारे कर्णधार होते. १९८७मध्ये त्यांना कर्णधारपदावरून काढण्यात आले होते. त्यानंतर आजतागायत परंपरागत क्रिकेटमध्ये कोणत्याही वेगवान गोलंदाजाने भारताचे नेतृत्व केलेले नाही.

"रोहितच्या आरटी-पीसीआर चाचणीचा अहवाल पुन्हा सकारात्मक आला आहे. त्यामुळे १ जुलैपासून सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या कसोटी सामन्यात तो खेळू शकणार नाही. रोहित सध्या विलगीकरणात असून, उपकर्णधार केएल राहुलसुद्धा या सामन्यात खेळणार नसल्याने



बुमराकडे कर्णधारपद देण्यात आले आहे," असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूत्रांनी सांगितले.

भारतीय संघ १९३२पासून कसोटी क्रिकेट खेळत असून, बुमरा हा ३६वा कर्णधार आहे. २९ कसोटी सामन्यांत १२३ बळी मिळवणारा गुजरातचा बुमरा हा जगातील सर्वोत्तम वेगवान गोलंदाज मानला जातो. भविष्यातील कर्णधार म्हणून बुमराकडे पाहिले जात असल्याचे निवड समितीचे अध्यक्ष चेतन शर्मा यांनी आधीच म्हटले आहे.

इंग्लंडविरुद्धचा कसोटी सामना ५ जुलैला संपणार आहे, तर पहिला ट्वेन्टी-२० सामना ७ जुलैला होणार आहे. या पार्श्वभूमीवर तारांकित कसोटी खेळाडूंना विश्रांती देत पहिल्या ट्वेन्टी-२० सामन्यासाठी आयर्लंडविरुद्धच्या मालिकेतील विजयी संघ खेळवण्यात येणार आहे, असे संकेत निवड समितीकडून मिळत आहेत. दुसऱ्या ट्वेन्टी-२० सामन्यासाठी मात्र कोहली, बुमरा, पंत, जडेजा आणि रोहित हे खेळाडू उपलब्ध होऊ शकतील. भारतीय संघ इंग्लंडविरुद्ध तीन एकदिवसीय आणि तीन ट्वेन्टी-२० सामने खेळणार आहे. रोहितने माघार घेतल्यामुळे युवा शुभमन गिलच्या साथीने चेतेश्वर पुजारा किंवा हनुमा विहारी यांच्यापैकी एकाला सलामीला उतरावे लागणार आहे. राखीव सलामीवीर म्हणून मयांक अगरवाल इंग्लंडमध्ये पोहोचला असला तरी अंतिम ११ खेळाडूंमध्ये त्याला स्थान देणे कठीण असल्याचे म्हटले जात आहे. २०१८च्या ऑस्ट्रेलियामधील मालिकेत गिलने काही काळ सलामीवीराची भूमिका पार पाडली होती. परंतु पुजाराला सलामीला पाठवण्याची शक्यता अधिक मानली जात आहे. त्यामुळे पुजारा, गिल, विहारी, विराट कोहली, श्रेयस अय्यर, ऋषभ पंत, रवींद्र जडेजा अशी भारताची फलंदाजीची फळी असेल. बुमराच्या साथीने मोहम्मद सिराज आणि मोहम्मद शमी वेगवान माऱ्याची धुरा सांभाळतील. परंतु शार्दूल ठाकूर हा चौथा वेगवान गोलंदाज खेळवायचा की फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनला संधी द्यावी, हा पेच भारतापुढे आहे.

### विम्बल्डन टेनिस स्पर्धा


# सेरेना पहिल्याच फेरीत गारद; पुरुषांमध्ये नदाल

## जोकोव्हिच, त्सित्सिपास, तर महिलांमध्ये हालेप, आंद्रेस्कू, पेगुला विजयी

**। लंडन । महाईन्यूज ।**

तब्बल ३६४ दिवसांनी टेनिस कोर्टावर पुनरागमन करणाऱ्या अमेरिकेच्या सेरेना विल्यम्सला विम्बल्डन स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले. पुरुषांमध्ये विक्रमी २२ ग्रँडस्लॅम विजेता राफेल नदाल, अग्रमानांकित नोव्हाक जोकोव्हिच, चौथा मानांकित स्टेफानोस त्सित्सिपास, तर महिलांमध्ये १६वी मानांकित सिमोना हालेप, बियांका आंद्रेस्कू, जेसिका पेगुला यांना विजय मिळवण्यात यश आले.

२३ ग्रँडस्लॅम विजेत्या सेरेनाला महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत फ्रान्सच्या हार्मनी टॅनकडून ५-७, ६-१, ७-६ (१०-७) अशी हार पत्करावी लागली. तीन तास आणि ११ मिनिटे चाललेल्या या सामन्यात सेरेनाला सर्वोत्तम खेळ करता आला नाही. बऱ्याच काळानंतर टेनिस खेळत असल्याने अखेरच्या काही गेममध्ये ४० वर्षीय सेरेनाला थकवा जाणवला. तसेच तिच्या खेळात नेहमीसारखी आक्रमकता दिसली नाही. तिने पहिला सेट



गमावल्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये पुनरागमन केले. मग तिसऱ्या सेटमध्येही दोन्ही खेळाडूंनी झुंजार खेळ केल्याने ६-६ अशी बरोबरी झाली आणि विजेती ठरवण्यासाठी टायब्रेकरचा अवलंब करण्यात आला. यात प्रथमच विम्बल्डनमध्ये खेळणाऱ्या टॅनने १०-७ अशी बाजी मारत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. महिलांमध्येच रोमेनियाच्या हालेपने चेक प्रजासत्ताकच्या कॅरोलिना मुचोव्हाचा ६-३, ६-२ असा पराभव केला. अमेरिकन खुल्या स्पर्धेच्या माजी विजेत्या आंद्रेस्कूने एमिना बेक्तासचा ६-१, ६-३ असा धुव्वा उडवला. अमेरिकेच्या पेगुलाने क्रोएशियाच्या डॉना व्हेकिचवर ६-३, ७-६ (७-२) अशी मात केली.


महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही